सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर २०२१

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय: ग्रामपंचायत पोटनिवडणूक २०२१ -
नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागांच्या आरक्षणाबाबत...

संदर्भ: १) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. १३१६/२०२१ मधील दिनांक १५/१२/२०२१ रोजीचा निर्णय.

२)राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का.८, दि.१७/११/२०२१ च्या आदेशान्वये दिलेला पोटनिवडणुकीचा कार्यक्रम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ॥। दि.२३/०९/२०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण देण्याची तसेच एकूण आरक्षण हे त्या स्थानिक स्वराज्य संस्थांतील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद करण्यात आली आणि त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १७/११/२०२१ रोजी ४५३३ ग्रामपंचायतीच्या ७०६० रिक्त जागांचा पोटनिवडणूक कार्यक्रम दिला, ज्यामध्ये सदर अध्यादेशातील तरतूदीनुसार नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी २७ % च्या मर्यादेत जागा आरक्षित करण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ अन्वये सदर अध्यादेशाला मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०६/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार सद्यस्थितीत सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेतील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागांच्या निवडणूकींना

स्थगिती दिली. त्यानुसार दिनांक ०७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगाने या पोटनिवडणुकांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित केलेल्या जागांच्या निवडणूका तात्काळ स्थगित केल्या. तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०६/१२/२०२१ च्या आदेशानुसार उपरोक्त पोटनिवडणूकातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व खुल्या जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणूका पुढे सुरू ठेवण्यात आल्या.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन रिट याचिकेमध्ये दि. १५/१२/२०२१ रोजीच्या सुनावणी नंतर पारीत केलेल्या आदेशामध्ये राज्य निवडणूक आयोगाला असे स्पष्ट निदेश दिले आहेत की, सुरू असलेल्या निवडणुक प्रक्रियेमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या ज्या जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे, त्या जागा तात्काळ अनारक्षित करुन सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर निकालामध्ये असेही स्पष्ट केले आहे की, राज्य निवडणूक आयोग या अनारक्षित झालेल्या नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या जागांच्या निवडणुकांचा कार्यक्रम एका आठवडयात जाहिर करेल आणि या अनारक्षित जागांचा निकाल हा सद्या सुरू असलेल्या अन्य जागांसाठीच्या निवडणूकांच्या निकालासोबत एकत्रित जाहिर करेल.

त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन क्र. १ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने संदर्भाधीन क्र. २ अन्वये जाहीर केलेल्या पोटनिवडणुकांबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१. राज्य निवडणूक आयोगाने वरील परिच्छेद १ मधील नमूद ग्रामपंचायत पोटनिवडणूक कार्यक्रमाकरीता अधिसूचित करण्यात आलेल्या नागरीकांच्या मागास प्रवर्गाच्या आरक्षित जागा या तात्काळ अनारक्षित करण्यात आल्याचे याद्वारे जाहिर करण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्यानुसार मुलतः नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित ठेवावयाच्या जागा या आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याच्या तत्वानुसार कोणत्या प्रभागात देय होतील हे निश्चित करण्यात यावे.

३. आवश्यकतेनुसार सदर जागांचे महिलांकरीता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. सोडत प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांकरिता आरक्षित होतील हे निश्चित करण्यात यावे.

४. सोडतीनंतर त्यानुसार महिलांकरीता सुधारीत आरक्षण अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

५. ज्या ग्रामपंचायतींमध्ये सुरु असलेल्या पोटनिवडणुका या केवळ अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / सर्वसाधारण या प्रवर्गाच्या जागांसाठी असून निवडणूक कार्यक्रम सुरु आहे, त्या जागांचे मतदान व मतमोजणी सध्या सुरु असलेल्या कार्यक्रमानुसार पूर्ण करण्यात यावी.

६. ज्या ग्रामपंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक जागांकरिता पोटनिवडणुका सुरु आहेत व त्यात नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त पदाची पोटनिवडणूक मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ६ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार स्थगित करण्यात आली आहे, त्या ठिकाणी -

i) सध्या सुरु असलेल्या कार्यक्रमानुसार ज्या जागांचे (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण ) मतदान दिनांक २१/१२/२०२१ रोजी होणार आहे, ते मतदान पूर्ण करण्यात यावे. मात्र त्याची मतमोजणी या आदेशासोबतच्या परिशिष्ट १ वरील सुधारीत कार्यक्रमानुसार दिनांक १९/०१/२०२२ रोजी घेण्यात यावी.

ii) नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या ज्या रिक्त पदाची पोटनिवडणूक मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ६ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार स्थगित करण्यात आली आहे, त्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन त्या निवडणुकांचे मतदान व मतमोजणी या आदेशासोबतच्या परिशिष्ट १ वरील सुधारीत कार्यक्रमानुसार होईल.

७. मतमोजणी पुढे ढकललेल्या ठिकाणी मतपेटया सुरक्षित ठिकाणी, योग्य त्या पोलीस बंदोबस्तात ठेवण्यासाठी योग्य ती सर्व कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे.

८. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे अनारक्षित करण्यात आलेल्या जागा या सर्वसाधारण / सर्वसाधारण महिलाकरीता अधिसुचित करुन भरण्याचा आणि एकत्रित निकाल जाहिर करण्याचा सुधारीत कार्यक्रम या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ नुसार आयोग जाहिर करीत आहे.

९. सदरील कार्यक्रमास योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

१०. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार सद्या सुरू असलेल्या आचारसंहितेचा कालावधी हा मतमोजणीच्या सुधारीत दिनांकापर्यंत लागू राहिल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग/वित्त विभाग तसेच सर्व प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
यांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आवश्यक अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्या मागणीचा विचार करुन त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.
६. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी
७.पोलिस महानिरीक्षक ( सर्व संबंधित), महाराष्ट्र राज्य
८. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
१०. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)
११. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.
१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग
१३. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
१४. निवड नस्ती.

## परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का.०८,दिनांक १७/१२/२०२१ च्या आदेशासोबतचे पत्र)

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. १३१६/२०२१ मध्ये दि. १५/१२/२०२१ रोजी निर्णयान्वये ना.मा.प्र. च्या रिक्त झालेल्या जागा सर्वसाधारण करुन पोटनिवडणूक घेण्याकरीता सुधारित निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | ज्या ठिकाणी सोडत काढणे आवश्यक आहे तिथे सोडतीकरीता विशेष ग्रामसभेची सूचना देण्याचा दिनांक | दिनांक १८/१२/२०२१ (शनिवार) |
| २ | विशेष ग्रामसभेमध्ये आवश्यकतेनुसार सर्वसाधारण जागा निश्चित करण्यासाठी सोडतीचा दिनांक | दिनांक २०/१२/२०२१ (सोमवार) |
| ३ | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करुन त्याबाबत योग्य ती सूचना व प्रसिध्दी देण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०२१ (सोमवार) |
| ४ | तहसिलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०२१ (सोमवार) |
| ५ | नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक २८/१२/२०२१ (मंगळवार) ते दिनांक ०३/०१/२०२२ (सोमवार) वेळ सकाळी ११.०० ते दु . ३.०० (दिनांक ०१/०१/२०२२ शनिवार व दिनांक ०२/०१/२०२२ चा रविवार वगळून) |
| ६ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक ०४/०१/२०२२ (मंगळवार) वेळ सकाळी ११.०० वाजल्यापासून छाननी संपेपर्यंत |
| ७ | नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक व वेळ (नमुना अ अ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी) | दिनांक ०६/०१/२०२२ ( गुरुवार ) दुपारी ३.०० वा. पर्यंत |
| ८ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ०६/०१/२०२२( गुरुवार ) दुपारी ३.०० वा. नंतर |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दिनांक १८/०१/२०२२ (मंगळवार) सकाळी ७.३० वा. पासून ते सायं.५.३० वा.पर्यंत (गडचिरोली जिल्ह्यासाठी सकाळी ७.३० वा. पासून ते दुपारी ३.०० वा. पर्यंत) |
| १० | मतमोजणीचा दिनांक (मतमोजणीचे ठिकाण व वेळ जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने तहसिलदार निश्चित करतील त्यानुसार राहील) | दिनांक १९/०१/२०२२ (बुधवार) |
| ११ | जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक २४/०१/२०२२ (सोमवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र